REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# प्राचीन खानदेशातील आभीर किंवा आहिर घराणे.

डॉ. एच. आर. चौधरी[१] , प्रा. एच. बी. सरतापे[२]
[१]सहयोगी प्राध्यापक, एच. आर. पटेल महिला, महाविद्यालय शिरपुर, जि. धुळे.
[२]सहाय्यक प्राध्यापक, वा.वि. महाविद्यालय नवापूर जि. नंदुरबार.

**प्रास्ताविक :-**

खानदेशच्या प्रदेशावर प्राचीन काळापासून अनेक राजवटींनी राज्य केले. याची माहिती उत्खननातून, संशोधनातून मिळते. मौर्यकाळापासून पुढे सातवाहन, कुषाण, आभीर. व त्यांचे मांडलिक, वाकाटक, बदामीचे चालुक्य राष्ट्रकुट व यादव घराण्यांनी खानदेशावर राज्य केल्याचे दिसून येते प्रस्तूत शोध निबंधात प्राचीन खानदेशातील आभीर किंवा आहिर घराण्यावर प्रकाश टाकला आहे.

*** खानदेशची व्युत्पत्ती :-**

सिनक्लेअर या विदवानाच्या मते खानदेश हे नाव बुऱ्हाणपुरच्या सुलतानांनी जी खान उपाधी लावली. त्यावरुन खानाचा देश तो खानदेश होय. याशिवाय खानदेश हे नाव कान्हा (देश) या शब्दावरुन पडले असावे.

खानदेश हा शब्द तानदेश (पाण्याची टंचाई असणारा देश) अथवा कांटादेश (काटेरी रोपटयांचा प्रदेश) याचा अपभ्रंस होऊन पुढे खानदेश नाव रुढ झाले असावे. खानदेशला दानदेश की जो डांगदेश पासून निर्माण झाला. असावा असे देखील म्हटले जाते. नासिक जिल्हयातील डांग, शिरवाना, अशा डोंगराळ भागाचा समावेश होत असावा. ऐन-इ-अकबरी आणि इतर मुस्लीम ग्रंथात लेखकांनी या प्रदेशाला खानदेश असे म्हटलेले आहे. अकबराने खानदेश जिंकल्यानंतर या प्रदेशाची कारभाराची सुत्रे राजपुत्र दानियाल याच्या हाती दिल्यावर त्याला दानदेश असे म्हटले होते. खानदेशच्या भौगोलिक सिमा या उत्तरेला सातपुडा पर्वत, दक्षिणेस सातमाळा, अजिंठा डोंगराच्या रांगेपर्यंत, पूर्वेला हाती टेकडयापासून, पश्चिमेस सहयाद्री डोंगराच्या रांगापर्यंत पसरलेला हा भूप्रदेश होता. १

देवगिरीकर यादवाच्या वंशातील सेऊणचंद्र पहिला या राजाच्या नावावरुन या प्रदेशास सेऊण देश असे नाव पडले असावे. २

खानदेश हा दक्षिणपथातील व दंडकारण्यातील भूप्रदेश ऋषिक देश, आसिक देश, अभीरांचा देश, पूर्वत्रिकूटक देश, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकुट, परमार, इत्यादी राजवटीचा भूभाग, कुंभकर्ण आणि दामन राजांचा एरंडापल्ला देश, सेऊनदेश इत्यादी नावाने संबोधिला जाणारा मुलूख होता. हे प्राचीन कालीन खानदेश संबंधीचे वाङःमय शिलालेख ताम्रपट इत्यादीच्या आधारे स्पष्ट होते. ३

*** खानदेशच्या सीमा :-**

खानदेशच्या सीमा या पूर्वेस असीरगड, दक्षिणेस पाटणे, पश्चिमेस नाशिक आणि मध्यभागी लळींग अशा होत्या सम्राट अकबराच्या काळात खानदेश सुभ्याच्या पूर्वेस वऱ्हाड, उत्तरेस माळवा, दक्षिणेस जालना व पश्चिमेस माळवा सुभ्याच्या दक्षिणेकडे पर्वत रांगा अशा सीमा होत्या.४

रामायण व महाभारत काळात ऋषिक अथवा खानदेश राज्याच्या उत्तरेला अनुप पूर्वेला विदर्भ राज्य आणि अहमदनगर जिल्हयाचा प्रदेश ही राज्य लागून हाती. ५

सध्याच्या खानदेशच्या सीमा या उत्तरेकडे सातपुडा पर्वत दक्षिणेकडे सातमाळा डोंगर अजिंठा डोंगर मनमाडजवळील गाळ टेकडयांपर्यंत आहे. त्यामुळे नासिक खानदेश सरहद्द आहे. पश्चिमेकडे सहयाद्रीच्या लहान टेकडया पर्वताच्या रांगा सोनगड पर्यंत आहेत. तापी नदीच्या बाजूने अक्राणीपर्यंत जाते.६



*** आभीर किंवा आहिर घराणे :-**

**आभीरांची उत्पत्ती :-**

अभिरांचा सर्वात अगोदरचा उल्लेख महाभाष्य ग्रंथात आढळुन येतो. अभिरांचा संबंध शुद्र जमाती बरोबर लावला आहे. महाभारतात अभिरांचा उल्लेख शुद्र लोकांच्या सहवासात राहणारे शुद्र म्हणुन केलेला आहे. सोद्राह शुद्र जमातीचा सहवासातच अभिर जमातीचे लोक

सरस्वती नदीच्या प्रदेशात राहात होते मनुच्या मते ब्राम्हण आणि हीन दर्जाची स्त्री यांच्यापासून अभिरांची उत्पत्ती झाली अभिरांचा शुद्र म्हणून उल्लेख आढळतो.७

*** आभिरांचे मुळ स्थान :-**

अभिर हे परकिय लोक होते. ते शक जमातीच्या टोळयाबरोबर पूर्व ईराण मधून भारतात आले . हेरात आणि कंदहार या प्रदेशा दरम्यानच्या अंबिरावन प्रदेशातील रहिवासी होते. महाभारतात अपरांत अभिरांचा प्रदेश सांगितला आहे. पेरिप्लस या ग्रंथात अभिरांच्या देशाला अबिरिया असे म्हटले आहे. पुराणा मध्ये दखखनच्या उत्तर पश्चिम प्रदेशात अभिर राज्यांचे साम्राज्य म्हटले आहे.८

*** आभिर घराण्यातील राजे :-**

ईश्वरसेन या आभीर राजाच्या नाशिक अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, सातवाहनाच्या सत्तेनंतर आभीर, श्रीपर्वतीय, शक, इ. घराण्यांनी खानदेशवर ठिकठिकाणी राज्य केले होते. यापैकी आभीरानी खानदेशात आपला ठसा उमटवला होता. आभीर हे व्यवसायाने गवळी असून क्षत्रप काळापासून मोठमोठया पदावर होती. आभीरांचा रुद्रभूति हा रुद्रसिंह या क्षत्रपाचा सेनापती होता.९

पुराणातील माहितीनुसार आभीरांनी खानदेशात एकूण ६७ वर्षे राज्य केले. त्यामुळे खानदेशचा इतिहास हा घडविण्यात आभीर राजांचा मोठा वाटा होता, हे स्पष्ट होते. खानदेशातील आभीर किंवा आहिर यांची खानदेशावर दिर्घकाळ सत्ता राहिल्याने आजही तेथे मोठया प्रमाणावर आहेर नावाचे लोक असल्याचे दिसून येते. तेराव्या शतकात खानदेश हा प्रदेश आहिर राजांचे सेनानी जिवाजी व गोवजी यांच्या अधिपत्याखाली होता. आणि खानदेशची व्यापारी दृष्टया भरभराट झालेली दिसून येते. १०

आभीर घराण्यात एकूण दहा राजे होऊन गेले. त्यामध्ये या घराण्याचा मूळ पुरुष हा शिवदत्त होय इ.स. २०३ ते २४० या काळात होऊन गेला. नंतर ईश्वरसेन याने इ.स.२४० ते २४८ या काळात राज्य केले तोच आभीर राजवटीचा संस्थापक पराक्रमी राजा मानला जातो. ११

ईश्वरसेन हा शिवदत्तचा मुलगा असून तो आभीरांचा पहिला राजा होता. त्याने राजन ही उपाधी धारण केली होती. या उपाधीवरुनच आभीर घराण्याचा संस्थापक ईश्वरसेन हा मानला जातो. ईश्वरसेनचे राज्य हे पश्चिम महाराष्ट्र, गुजरात व कोकण या भागात पसरले होते. हे त्याने सुरु केलेल्या कालगणनेच्या अमलावरुन स्पष्ट होते. १२

ईश्वरसेन आभीर राजाचा नासिक येथील दहाव्या क्रमांकाच्या लेण्यात एक शिलालेख कोरलेला आहे. याने सातवाहन राजा चौथा पुलमावी याचा पराभव केला असे पुराणावरुन स्पष्ट होते. त्यांचे साम्राज्य उत्तर महाराष्ट्रातील नासिक प्रदेशापर्यंत पसरलेले होते. उपरांत आणि लाट या प्रदेशातही अभीरांच्या संवताचा वापर केला जात असे. तसेच नर्मदा नदीच्या किनाऱ्यावरील अनुप प्रदेश हा मुलतः कलचुरीचा प्रदेश होता. त्या प्रदेशातही आभीरांच्या संवतचा वापर करीत असल्याचे दिसून येते. या प्रदेशावरही आभीरांचे वर्चस्व होते. हे स्पष्ट होते. १३

आभीर राजा व वसुषेन हा उज्जैनचा शक राजा रुद्रदामन दुसरा याचा सपकालीन होता. रुद्रदामन दुसरा हा महाक्षत्रप होता. याने इ.स. ३३२ ते ३४८ या काळात राज्य केले. आभीर राजा व वसुषेन याने आंध्रप्रदेशावरील सत्तेचे उच्चाटन केले होते. असे तत्कालीन शिलालेखात दिसून येते. त्यावरुन अभिर राज्याच्या साम्राज्याचा गुजरात महाराष्ट्रापासून ते आंध्रप्रदेशापर्यंत विस्तार आलेला होता हे स्पष्ट होते. १४

आभीर राज्यातील ईश्वरसेन राजा व्यतिरिक्त इतर राजाची नावे येत नसली तरी कामसुत्रामध्ये कोट्टराज व नागार्जुनकोंडा येथील लेखात वसुषेण व आणखी दोन आभीर राजांचे उल्लेख मिळतात. पुराणांनी दहा राजांनी मिळुन ६७ वर्षाची कारकीर्द दाखविली आहे. तर डॉ. अ.स. आळतेकर यांनी त्यांचा काळ १६७ वर्षे होता. व तो इ.स. ४१६ पर्यंत असावा असे म्हटले आहे. खानदेश मध्यप्रदेश व गुजरात येथे उपलब्ध झालेल्या अभिलेखाव्दारे असे स्पष्ट होते की, आभिरानंतर त्याच्या मांडलिक राजाचे ही राज्य होते. १५

आभीरांच्या काळात खानदेशात अचलपूरपासून कृष्णा वेण्णा नदया दरम्यान पसरलेल्या भूभागाचा अंतर्भाव होत होता म्हणजेच आजचा वर्धा, अचलपूर, बैतुल, जळगांव, धुळे, नासिक पर्यंतचा भूभाग समाविष्ट झालेला होता. १६

*** आभीर राजवटीचा शवेट :-**

इ.स. चौथ्या शतकात गुप्त सम्राट समुद्रगुप्त याने आपला साम्राज्य विस्तार मोठया प्रमाणावर केला दक्षिणेतील अनेक राजांचा त्याने पराभव केला होत. खानदेशातील एरंडपल्ला म्हणजेच एरंडोल येथील दामन राजाचा ही पराभव केलेला होता. खानदेशातील आभिर राजाचा ही समुद्रगुप्ताने पराभव केलेला असावा. मात्र पराभूत राजाने मांडलिकत्व मान्य केल्यानंतर त्याच्याकडून खंडणी वसूल करुन पूर्ववत त्याच्याकडेच सत्ता सोपवली जायची. त्याप्रमाणे आभीराकडे सत्ता कायम राहिली असावी. आभीर राजे स्वतः हून समुद्रगुप्ताला शरण गेले असावेत. यावरुन महाराष्ट्रातील आभीर जमाती व आभीर राजे हे समुद्रगुप्तांचे मांडलिक होते हे स्पष्ट होते. १७

खानदेशावर राज्य करणारी आभीरांची काही मांडलिक राजघराणी होती. हे गुजरात व खानदेशात सापडलेल्या ताम्रपटावरुन स्पष्ट होते. पश्चिमेस खानदेशातील प्रकाशे येथून काढलेल्या एका दानपत्रात ईश्वरात या मांडलिक राजाची माहिती मिळते त्याची सत्ता खानदेश व गुजरातवरील इ.स. ४०० पर्यंत टिकून होती असे दिसते. १८

डॉ. व्हि. व्हि. मिराशी यांच्या मते सातवाहनानंतर खानदेशावर इ.स. चौथ्या शतकात आभीरांचे मांडलिक राजे स्वामीदास, मुकुंद, रुद्रदास इ. होते. त्याची राजधानी वाल्खा होती. १९

*** सारांश :-**

खानदेशावरील आभीर घराणे हे महत्वाचे घराणे होऊन गेले. आभीर घराण्यात ईश्वरसेनसह अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. आभिरांनी फार मोठा साम्रज्य विस्तार केलेला होता. आभिरांच्या पराक्रमामुळे अनेक मांडलिक राजानी त्याचे स्वामीत्व स्वीकारले होते. आभिरांच्या काळात आर्थिक भरभराट घडून आलेली होती.

*** संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. महाजन टी.टी. खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेंन्टल प्रकाशन विजयनगर पुणे. १९९८ पृष्ठ ११,१२
२) चौधरी कि.का. जळगांव जिल्हा गॅजेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई १९९४ पृष्ठ १
३) डॉ. महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास आणि संस्कृती, दिलीपराज प्रकाशन. पुणे.२००५ पृष्ठ ६२
४) फजल अबुल, ऐने अकबरी ( इंग्रजी भाषांतर, कर्नल एच.एस. जॅरेट) खंड दुसरा १९८९, पृष्ठ २३२
५) मिराशी वा.वि. संशोधन मुक्तावली, खंड ८वा पृष्ठ १२०
६) डॉ. देशपांडे प्र.न.(संपा.) आखिल महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन चौथे. नागपुर शोध निबंध संग्रह १९९५ पृष्ठ ५९
७) डॉ. महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास, दिलीपराज प्रकाशन पुणे, २००५ पृष्ठ १९४
८) कित्ता पृष्ठ १९५
९) चौधरी किं.का. उपरोक्त पृष्ठ ६३
१०) डॉ. महाजन टी.टी. खानदेशचा राजकीय व संस्कृतिक इतिहास. उपरोक्त पृष्ठ १४
११) कित्ता, पृष्ठ. ११३
१२) चौधरी कि.का. उपरोक्त पृष्ठ ६३
१३) डॉ. महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास. उपरोक्त पृ.११९
१४) डॉ. महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास आणि संस्कृती उपरोक्त पृष्ठ १२०-१२१
१५) चौधरी किं.का. उपरोक्त पृ.६३
१६) डॉ. महाजन टी.टी. प्राचीन खानदेशचा इतिहास आणि संस्कृती, उपरोक्त पृ.११३
१७) कित्ता पृ.१२१
१८) कित्ता पृ.१२४
१९) चौधरी कि.का. उपरोक्त पृष्ठ. ६४



**डॉ. एच. आर. चौधरी**
**सहयोगी प्राध्यापक, एच. आर. पटेल महिला, महाविद्यालय शिरपुर, जि. धुळे .**